# अमृत कुंभ



वर्ष 8 | अंक 6 | फेब्रुवारी –मार्च 15 | मूल्य रु. 10/-

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

वर्ष ८ । अंक ६ । फेब्रुवारी - मार्च २०१५

## मुखपृष्ठाविषयी

*हिंदु, मुस्लिम, शीख व ख्रिस्ती सर्वजण आपापसात भाऊ-भाऊ आहेत, अशी घोषणा तर बहुतेक लोक करतात. परंतु ते हे जाणत नाहीत की सर्वांचा पिता कोण आहे. देहाच्या दृष्टीने हे भाऊ-भाऊ नसले तरी आत्मिक दृष्टीने ते सर्व एक परमात्म्याची मुले असल्याने भाऊ-भाऊ आहेत. प्रत्येक धर्माचा संस्थापक वेगवेगळा असला तरी सर्व धर्माचे अनुयायी निराकार ज्योतिस्वरूप शिव परमात्म्याच्या प्रतिमेला (शिव-लिंगाला) या ना त्या रूपाने पूजतात.*

*हिंदु लोक 'ॐ नमः शिवाय' असे गायन व पूजन करतात. मुसलमानांच्या मक्का येथील मुख्य तीर्थ-स्थानात एक अशाच आकाराचा पाषाण आहे. त्याला ते लोक 'संग-ए-असवद्' व भारतातील लोक मक्केश्वर म्हणतात. गुरु नानकही एक निराकार ज्योतिस्वरूपाची महिमा गात असत. येशू ख्रिस्तही म्हणत असत की 'गॉड इज लाइट' अर्थात परमात्मा एक ज्योति आहे. यावरून हे स्पष्ट होते की परमात्मा एक प्रकाश (Light) आहे. एक ज्योति अथवा नूर आहे. तो सर्व गुणांचा सागर आहे. तो सत्य आहे, शिव आहे, सुंदर आहे.*

*शेवटी सर्व बांधवांना महाशिवरात्रीच्या कोटी-कोटी मंगलकामना!* -- *प्रकाशक, अमृतकुंभ.*

**वार्षिक वर्गणी रु. ६०/-**
**अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-**
**आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

## -- अंतरंग --


- आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी — २
- महाशिवरात्रीच्या शुभपर्वावर, अवतरले शिव सर्वेश्वर (संपादकीय) — ३
- प्रभूप्रेमात रंगले अंतरंग — ६
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... — ९
- त्वमेव माताच पिता त्वमेव — १२
- अमृतवेला — १४
- सचित्र सेवावृत्त — १५
- आपल्या संपन्न आत्मस्थितीला तडा देणारा खतरनाक मनोविकार - मोह — १९
- तणावाचे कारण व निवारण — २४
- वर्णमालेत गवसले जीवनमर्म (भाग १६) — २७
- वाचकांशी हितगुज — २९
- ७ अरब सत्कर्मांची महायोजना — ३०
- सत्कर्मांसाठी माझे योगदान (फॉर्म) — ३२


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाउस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.



# आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी, एक दुसऱ्यासाठी सन्मान व स्नेहभाव हवा, म्हणजे वायुमंडळ शक्तिशाली बनेल

*-- दादी जानकीजी.*

अव्यक्त बापदादांच्या मधुर मीलनासाठी मधुबनला जाणे म्हणजे शांती व प्रेम, खुशी व शक्ती यांचा अपार खजिना जमा करणे होय. आता संगमयुगात एक आहेत शिवबाबा, दुसरं म्हणजे मी आत्मा आहे व तिसरी गोष्ट म्हणजे शिवबाबांनी इतका मोठा अविनाशी यज्ञ रचला आहे. इतका मोठा ब्राह्मण परिवार आहे. त्यामुळे महिमा करावी ती कोणाची, आपल्या भाग्याची की भगवंताची? यज्ञाची का समयाची, का परिवाराची? ब्राह्मण परिवाराला पाहून सदैव एक गीत आठवते - 'जिसकी रचना इतनी सुंदर, वो (रचयिता) कितना सुंदर होगा'.

रचयिता परमपिता शिव परमात्मा (शिवबाबा) संगमयुगात अवतरित होऊन, आपल्याला सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान देतात त्यामुळे रोज ज्ञानमुरली लक्षपूर्वक अभ्यासावी. शिवबाबा कसे येतात व केव्हा येतात? कलियुगाचे अंती जेव्हा देवी-देवता धर्माचे नावनिशाण देखील उरत नाही. भक्त देवी-देवतांची पूजा करतात परंतु ते स्वतःला देवी-देवता समजत नाहीत तसेच अशुद्ध खानपान व फॅशन यांच्यामुळे धर्माची ग्लानी होते. अशा धर्मग्लानीच्या वेळी शिव परमात्म्याचे अवतरण होते. ते आपल्याला स्वधर्माची ओळख करून देतात. शांती हा आपला स्वधर्म आहे. परंतु जेव्हा आपण शुद्ध अर्थात पवित्र बनू तेव्हाच शांती स्वधर्मात राहू शकू.

**शिवबाबा अतिशय दयाळू व कृपाळू आहेत. ते आपल्याला हेच सांगतात की 'तुम्ही स्वतःला आत्मा समजून, माझी आठवण करा म्हणजे मी तुमच्या पूर्व जन्मातील तसेच या जन्मातील विकर्मांची क्षमा करीन. तुमच्या मागील विकर्मांचा विनाश करीन, त्याचबरोबर श्रेष्ठ कर्म करण्यासाठी शक्ती प्रदान करीन.' म्हणूनच प्रत्येकाने 'मी शिवबाबांचा, शिवबाबा माझे' ही भावना मनात दृढ धरली पाहिजे तसेच दुसऱ्यांनाही शिवबाबांचा परिचय दिला पाहिजे.** त्यासाठी आधी स्वतः ज्ञानाची धारणा करा नंतर दुसऱ्यांना ज्ञान सांगा कारण जितकी आपली धारणा असेल तितकीच सेवा होते. ज्ञान आणि योगाच्या धारणेनेच आजवर सेवा झाली आहे. ज्ञान आणि योगाचे प्रत्यक्ष प्रमाण आहे धारणा अर्थात ब्राह्मण जीवन.

**आता फक्त एकच गोष्ट करा की आपल्या मनात साधारण तसेच व्यर्थ संकल्पांना येऊ देऊ नका नाहीतर तशी सवय लागेल. एक दुसऱ्याला पाहून आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी, वायब्रेशन (प्रकंपन) शक्तिशाली हवेत, एक दुसऱ्यासाठी सन्मान, सत्यता व प्रेम हवे. कारण प्रेम असेल तर आपल्याला कुणाचे अवगुण दिसणार नाहीत. सर्वांचे गुण तेवढे दिसतील.** वास्तविक साधारण पुरुषार्थी जीवन हे खरे जीवन नव्हे, यात कुठलाही आदर्श नाही. आपल्याला आदर्श बनण्यासाठी शिवबाबांनी जे ज्ञान दिले आहे, त्याआधारे सदैव आत्मअभिमानी स्थितीत राहा. राजयोगी अर्थात कर्मयोगी बनून राहणे. कर्मयोगी हाच खरा योगी होय. ड्रामाअनुसार ज्ञानात येण्यापूर्वी देखील मी कुठलेही वाईट कर्म केले नव्हते. तथापि शिवबाबांनी आता आपल्याला जे श्रेष्ठ कर्म करायला शिकवले आहे त्यात फार मोठी शक्ती आहे. आता ब्राह्मण जीवनात श्रीमतानुसार तन-मन-धनाने श्रेष्ठ कर्म करून, गती-सद्‌गती प्राप्त करायची आहे.

मनापासून सेवा केल्यानेच 'अथक भव'चे वरदान प्राप्त होते. फलस्वरूप कधी थकावट येत नाही. मुखातून कधी रफ शब्द निघत नाहीत. **समजा तुम्ही खूप सेवा केली परंतु एखादा रफ शब्द बोलतात तर त्यात सेवा काय झाली? बोलणे व चालणे यात समानता असेल तरच ती खरी सेवा होय. त्याद्वारेच नशा व खुशी प्राप्त होते.** बाकी नशेत तर नुकसान आहे पण हा नशा लक्ष्मी-नारायण बनण्याचा आहे. लक्ष्मी-नारायण अर्थात लक्षण तसे असले पाहिजेत. शिवबाबांनी सांगितले आहे की स्वदर्शनचक्र फिरवित राहा.

▶ पान क्र. ५ वर

संपादकीय..

# महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर, अवतरले शिव सर्वेश्वर

जशी दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवस असे हे कालचक्र अव्याहतपणे चालू असते; या कालचक्रातील दिवस आणि रात्र यांचा कालावधीही ठरलेला आहे. त्याचप्रमाणे ब्रह्माचा दिवस आणि ब्रह्माची रात्र यांचाही कालावधी सुनिश्चित आहे. या सृष्टिचक्ररूपी नाटकाचे चार भाग आहेत - सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग. प्रत्येक युग हे १२५० वर्षांचे असून एका सृष्टिचक्राचा कालावधी ५००० वर्षांचा आहे. यातील सत्य आणि त्रेतायुगाच्या २५०० वर्षांच्या कालावधीला ब्रह्माचा दिवस असे म्हटले जाते. तसेच द्वापरयुग व कलियुगाच्या २५०० वर्षाच्या कालावधीला ब्रह्माची रात्र म्हणतात. **ब्रह्माची रात्र जेव्हा संपायला येते त्यावेळी ज्ञानसूर्य शिव परमात्मा अवतरित होतो व सृष्टीवरील अज्ञान अंधःकार दूर करतो. म्हणूनच ज्ञानसूर्य शिव परमात्म्याच्या अवतरणाला महाशिवरात्री अथवा शिवजयंती असे म्हटले जाते.**

महाशिवरात्री महोत्सव माघ वद्य चतुर्दशीला येतो, त्यामागे देखील आध्यात्मिक रहस्य आहे. रात्री हा शब्द अज्ञान, अधर्म, अपवित्रता वा तमोप्रधानतेचे प्रतीक आहे. वद्य पक्षाच्या चतुर्दशीच्या रात्री घोर अंधार असतो. शिवाय माघ महिना हा वर्ष संपण्यापूर्वीचा महिना आहे. म्हणूनच माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्री साजरी करण्याचा अर्थ असा आहे की, कलियुग पूर्ण होण्याच्या आधी काही वर्षे परमपिता शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण होते. त्यावेळी संपूर्ण सृष्टी अज्ञान अंधःकारात बुडून गेलेली असते. मनोविकार व आसुरी लक्षणे यांचा कळस सर्वत्र पहायला मिळतो. अशा धर्मग्लानीच्या वेळी अधर्माचा विनाश व एक सत्‌धर्माची स्थापना करण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रत्येक कल्पाच्या अंती होते. याचेच गायन गीतेतही केले आहे, 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्...' (अध्याय ४/८).

आपणा सर्वांना हे जाणून अति हर्ष होईल की कलियुगाचे अंतिमसमयी सन १९३६ मध्ये, निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण, साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात झाले आहे. त्यामुळे आपण यावर्षी ७९ वी शिवजयंती मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी करीत आहोत. याविषयीचे वर्णन एका कवीने अतिशय सुंदर शब्दात केले आहे -

निराकार शिव साकार होतसे।  
ब्रह्मातनाचा तो आधार घेतसे।  
नव्या युगाच्या निर्माणास्तव,  
अवतरले शिव सर्वेश्वर।  
शिवरात्रीच्या शुभ पर्वावर...

## ❒ शिव मंदिरातील नंदी कशाचे प्रतीक आहे?

महाशिवरात्रीला शिव मंदिरात गेल्यानंतर भक्तगण प्रथम नंदीची पूजा करतात. एवढंच नव्हे तर त्याच्या शिंगातून शिवलिंगाचे दर्शन घेतात. परंतु भक्त हे जाणत नाहीत की नंदी कशाचे प्रतीक आहे. वस्तुतः प्रजापिता ब्रह्माबाबा ज्यांच्या शरीरात अवतरित होऊन निराकार शिव परमात्मा सत्य-गीता-ज्ञान देतात, त्यांचे प्रतीक नंदी आहे. त्याचबरोबर प्रजापिता ब्रह्मा हे शिव परमात्म्याचे एकमेव माध्यम असल्याने, कुठल्याही मनुष्यात्म्याची शिव परमात्म्याशी भेट प्रजापिता ब्रह्मा यांच्याद्वारेच होते. म्हणूनच नंदीच्या दोन शिंगातून शिवलिंगाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. **या अनुषंगाने त्रिकालदर्शी ज्ञानसागर शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय बोधप्रद आहेत, 'दिखलाते है ना रथ पर अर्जुन को ज्ञान दिया। अब एक को थोडे ही बैठ गीता ज्ञान सुनायेंगे? यह सभी रांग (गलत) है। रथ तो वास्तव में प्रजापिता ब्रह्मा का साकार तन है। भाग्यशाली रथ वा नन्दीगण है। है तो मनुष्य, परन्तु मन्दिरोमें फिर बैल को रख दिया है। अर्थ चाहिए ना। सच तो है मनुष्य तन। इनको नन्दीगण कहा जाता है। बाप इन पर सवार होते है।'**

## ❐ महाशिवरात्री हेच शुभपर्व

महाशिवरात्रीचे पर्व हे परमात्म्याच्या दिव्य अवतरणाचे यादगार पर्व असल्याने ते सर्वात शुभ तसेच महानतम् पर्व आहे. शिव परमात्मा कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ अर्थात संगमयुगात अवतरित होतात व ब्रह्मामुखकमलाद्वारे सत्य गीता ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात. याच्या धारणेनेच मानव देवतातुल्य बनतो. याचेच गायन आजही केले जाते, 'नर ऐसी करनी करे, जो नर से नारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारीसे श्रीलक्ष्मी बने।' अशाप्रकारे कलियुगाची अज्ञान रात्र संपून सत्ययुगाची नवप्रभात उदयाला येते. ही भारतभूमी पुन्हा स्वर्गभूमी बनते. **या अनुषंगाने परमात्मा शिव पित्याची पुढील महावाक्ये प्रत्येकाने आपल्या हृदयात जरूर साठवावीत - 'तुम सर्वशक्तिवान बाप से योग लगाते रहो। जिस योगबल से तुम विश्व के मालिक बनते हो। तुम हो गुप्त शिवशक्ति सेना। शिवबाबा से योग लगाकर शक्ति ले रहे हो। स्वर्ग की राजधानी स्थापन करने वाला, गॉडफादर आते ही है तुम्हे स्वर्ग का मालिक बनाने।'**

यावरून आपल्या लक्षात आले असेल की महाशिवरात्रीचे पर्व विश्व परिवर्तन आधार आहे, म्हणूनच त्याची महिमा अपरंपार आहे. याचेच प्रतीक म्हणून जेव्हा स्वस्तिकाचे चित्र काढले जाते तेव्हा कलियुगाच्या अंतिम भागाकडे वरती 'शुभ' व सत्ययुगाच्या आदिभागाकडे 'लाभ' असे लिहिले जाते. हे सर्व जाणल्यानंतर साहजिकच प्रत्येकाला वाटेल की आपणही सत्ययुगी महाराजा-महाराणी पद प्राप्त करावे. त्यासाठी आपण परमात्मा शिव पित्याद्वारे स्थापित प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्व-विद्यालयाला अवश्य भेट द्यावी. आज या संस्थेच्या १३५ देशांतून सुमारे ९००० शाखा निःस्वार्थ भावनेने सेवारत आहेत. खरं तर हे शिव पित्याचे (शिवबाबांचे) कार्य आहे. बाकी सर्व निमित्त मात्र आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ब्रह्माद्वारे नवीन दुनियेच्या स्थापनेचे हे ईश्वरी कार्य संपन्नतेच्या अगदी समीप आहे. त्यामुळे या शिवरात्रीला संस्थेच्या नजीकच्या सेवाकेंद्रात जाऊन ज्ञान अमृताचे पान अवश्य करा व अमर-लोकीचा वारसा परमात्मा शिव पित्याकडून प्राप्त करा.

## ❐ शिव परमात्माच सर्वेश्वर

शिव परमात्माच सर्व आत्म्यांचा पिता, परमपिता आहे. तो निराकार आहे. तोच सर्व आत्म्यांचा परमशिक्षक व सद्गुरु आहे. सर्वांना मुक्ती व जीवनमुक्ती प्रदान करणारा आहे. तोच सर्व आत्म्यांचा लिबरेटर व गाइड आहे. तोच ब्रह्मा, विष्णु व शंकर या त्रिदेवांचा रचयिता असल्याने, त्यालाच त्रिमूर्ती शिव भगवान असे संबोधले जाते. (म्हणूनच शिवलिंगावर त्रिपुंड लावले जाते व तीन पानाचे बेलपत्र अर्पित केले जाते.) भगवान सदा विदेही, अशरीरी, अव्यक्त, अभोक्ता, सदा पावन, जन्म-मरण रहित, वर्ल्ड ऑलमाइटी अथॉरिटी, सर्व शक्तिवान, पतितपावन आहे. त्यामुळे अन्य कुठल्याही देवी-देवतांना भगवान मानणे अयथार्थ आहे. शिव परमात्माच देवांचाही देव महादेव तसेच सर्वेश्वर आहे. सर्व धर्मात त्याचीच मान्यता आहे.

हिंदू लोक शिव परमात्म्याला मानतात. सोमनाथ, अमरनाथ, पशुपतीनाथ इत्यादी बारा ज्योतिर्लिंगे शिव परमात्म्याचीच स्मरणचिन्हे आहेत. गोपेश्वर तसेच रामेश्वर येथील मंदिरा-वरून स्पष्ट होते की शिव परमात्मा, श्रीकृष्ण तसेच श्रीराम या देवतांनाही पूज्य होते. मुसलमानांच्या मक्का येथील मुख्य तीर्थस्थानातही शिवलिंगाच्याच आकाराचा पाषाण आहे. त्याला ते 'संग-ए-असवद्' असे म्हणतात. महंमद पैगंबराने त्याची स्थापना केली असे मानतात. ख्रिश्चन धर्माचा संस्थापक जीझस् ख्राइस्ट व शीख धर्माचा संस्थापक गुरुनानक यांनीही परमात्म्याला ज्योतीच मानले आहे. यहूदी लोक तर परमात्म्याला जेहोवा या नावाने संबोधतात जो शिव शब्दाचा अपभ्रंश असावा असे वाटते. जपानमध्येही बौद्ध धर्माचे कित्येक लोक अशा आकाराची एक प्रतिमा आपल्यासमोर ठेवून त्यावर आपले मन एकाग्र करतात.

**तात्पर्य म्हणजे आत्मिक दृष्टीने आपण सर्व एक परमात्मा शिव पित्याची मुले आपापसात भाऊ-भाऊ आहोत. हे सत्य जाणल्यानेच विश्वात शांती, सद्भावना, एकता व बंधुभाव निर्माण होईल.** म्हणूनच एक ईश्वर, एक विश्व परिवार (*One God, One World Family*) हा महत्वपूर्ण संदेश प्रजापिता ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे विश्वभरात नुकताच देण्यात आला. परंतु अज्ञान-निद्रेत गाढ झोपी गेलेल्या

कुंभकर्णासारखी आजच्या माणसाची स्थिती आहे. बहुतेक लोक ईश्वरी संदेश एका कानाने ऐकतात व दुसऱ्या कानाने सोडून देतात. परिणामतः दिवसेंदिवस मनुष्याचे झपाट्याने अधःपतन होताना दिसत आहे. प्रिय बंधूंनो, आपण मात्र तसे करू नका. वर्तमान-समयी परमात्मा शिव अवतरित होऊन आपल्याला जे ईश्वरी ज्ञान आणि सहज राजयोग शिकवित आहेत, त्याद्वारे आत्म्यात आध्यात्मिक जागृती उत्पन्न करा. याचेच प्रतीक म्हणून भक्तगण महाशिव-रात्रीला जागरण करतात. यादिवशी ते उपवासही करतात परंतु उपवासाचा खरा अर्थ ते जाणत नाहीत. उपवास अर्थात (उप-समीप वा निकट, वास - राहणे) परमात्म्याच्या समीप राहणे अर्थात आपल्या मन-बुद्धीने परमात्म्याशी योगयुक्त होणे. याद्वारेच मनुष्य देवतातुल्य बनतो. तात्पर्य म्हणजे महिमा सारी एक शिव सर्वेश्वराचीच आहे, म्हणूनच भक्तिमार्गात 'शिव परमात्माय नमः' असे गायन केले जाते.

## ❒ शिव परमात्मा भारतातच स्वर्ग स्थापन करतात

आपणा सर्व भारतीयांना हे जाणून अतिशय आनंद होईल की परमपिता शिव परमात्मा प्रत्येक कल्पात भारतातच स्वर्ग स्थापन करतात. किंबहुना भारतात स्वर्ग स्थापण्यासाठीच परमात्म्याचे दिव्य अवतरण होते. म्हणूनच शिव परमात्म्याला 'हेवनली गॉड फादर' (स्वर्गाचा रचयिता) असेही संबोधले जाते. **परमात्मा शिव हे ब्रह्मा, विष्णु व शंकर या त्रिदेवांचे निर्माता असल्याने, त्यांना 'त्रिमूर्ती शिव भगवान' असेही म्हणतात. ते ब्रह्माद्वारे सत्ययुगी दैवी सृष्टीची (स्वर्गाची) स्थापना, शंकराद्वारे कलियुगी आसुरी दुनियेचा विनाश व विष्णुद्वारे दैवी सृष्टीची पालना करवितात. म्हणूनच शिव परमात्म्याला कर्ताकरविता असेही म्हटले जाते.** भक्तिमार्गात शिव व शंकर यांना एकच मानले जाते परंतु शिव परमात्मा रचयिता आहे व शंकर देवता रचना आहे. शिव परमात्मा परमधाम निवासी आहे व शंकर देवता सूक्ष्म लोकनिवासी आहे. अशारीतीने ज्ञानसागर शिव परमात्मा अवतरित झाल्यानंतरच मनुष्य आत्म्यांना सत्य ज्ञान प्राप्त होते आणि या ज्ञानानेच सद्‌गति प्राप्त होते अर्थात भविष्य २१ जन्मांकरिता स्वर्गाचे राज्यभाग्य प्राप्त होते.

**या अनुषंगाने शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय सुस्पष्ट आहेत, 'मीठे बच्चे, बाप भारत में आते ही है स्वर्ग रचने लिए। तो भारतवासी स्वर्गवासी, स्वर्ग के मालिक होने चाहिए। शिवजयन्ति भी भारतमें ही मनाते है, तो जरूर भारत को कुछ दिया होगा। अभी तुमको स्वर्ग की बादशाही दे रहे है ना। बाप अनेक बार आये है स्वर्ग की स्थापना करने। नरक का विनाश हो जाना है।'**

तात्पर्य म्हणजे महाशिवरात्रीच्या महाकल्याणकारी पर्वाला ओळखा व परमात्मा शिव पित्याकडून स्वर्गाचा (सदा सुखाचा) वारसा हक्क प्राप्त करा, हीच परममंगल शुभभावना व शुभकामना ! त्यासाठी सर्वप्रथम आपले सत्य स्वरूप ओळखा. स्वतःला आत्मा समजून, परमात्मा शिव पित्याची प्रेमपूर्वक आठवण करा. तसेच आपले जीवन-पुष्प शिव परमात्म्यावर अर्पण करा. हाच भाव पुढील काव्यपंक्तीतून सुंदररीतीने व्यक्त होतो -

**आत्मज्योत जागवूनी, जागृती करू।**
**ज्योतिर्बिंदू परमात्मा, अंतरी स्मरू।**
**जीवन पुष्प हे, वाहु शिवा वरी।**
**हर्षभरे शिव जयंती, करू साजरी।।**

---

▶ पान क्र. २ वरून

आपले पहिले बोट दर्शवते की कोण; दुसरे बोट दर्शविते की कोणाचा आणि तिसरे बोट दर्शविते स्वदर्शन चक्र अर्थात आपण कल्पापूर्वीचेच आहोत तसेच पुढील कल्पातही असू.

सेवेत जरासुद्धा अभिमान नसावा तेव्हाच संपूर्ण समर्पण म्हटले जाईल. कित्येक जण समर्पण होऊन देखील सेवा करीत नाहीत आणि काही जण सेवा करतही असले तरी ते सेवेच्या अभिमानातून सुटत नाहीत. याला काय म्हणावे ? **जरी तन-मन-धन समर्पित केले तरी आपल्या दृष्टी-वृत्तीत संपूर्ण पवित्रतेची धारणा, व्यवहारात सत्यता, नम्रता, मधुरता या गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी अमुक सेवाकेंद्राची इन्चार्ज आहे, झोन इन्चार्ज आहे, या सर्व गोष्टी डोकं खराब करणाऱ्या आहेत. मी तर ना कुठल्या झोनची इन्चार्ज आहे, ना कुठल्या सेवाकेंद्राची. माझे कुठलेही सेंटर नाही, कुठलाही झोन नाही, माझा कोणी स्टुडन्ट नाही. मी एकदम फ्री आहे. बस, मी आत्मा शिवबाबांची आहे त्यानंतर सर्वांची आहे.** ❖❖❖

# प्रभूप्रेमात रंगले अंतरंग

*ब्र.कु.गुणवंत पाटील, बिबवेवाडी-पुणे.*

प्रेम हा माणूसपण शोधण्याचा सुंदर मार्ग आहे. याच मार्गाने आम्ही प्रभूपित्याच्या जवळ जाऊ. देवत्वाकडे वाटचाल करण्याची ही सहज वाट आहे. प्रेमाचा उदगम जे हृदय (अंतर्मन) ते आपल्याला जन्मापासून मिळते पण बुद्धी म्हणजे समज ही आपले घर, शाळा, समाज यांच्याकडून मिळते. हृदय सकारात्मक प्रेम शिकवते पण बुद्धीचा धर्म हा नकारात्मकच जास्त असतो. हृदय मोठी गोष्ट छोटी करते याउलट बुद्धीला विस्तारात जास्त रस असतो.

**तसे पाहिले तर या देहमंदिरात मन आणि बुद्धी यांचे भिन्न पण महत्वाचे स्थान आहे. बुद्धीने ज्ञानाचा दीप सदैव तेवत ठेवायचा तर मन हे प्रभूप्रेमाने भरून घ्यायचे आहे. तेव्हा दोघेही मनुष्य जीवनात तेवढेच महत्वाचे आहेत. या दोघांचे पावित्र्य कायम ठेवले पाहिजे, तरच प्रभूप्रेमाची निर्मलता, सार्थकता अनुभवता येईल.**

आमचे प्रभूप्रेम जेवढे आंतरिक, खरे तेवढे भाग्य थोर. पद्मापद्म भाग्याचे तेव्हाच आपण मानकरी होऊ. पण हे प्रेम जर बौद्धिक, दिमागी असेल, बुद्धी प्रामाण्यावर आधारित असेल तर ते अविनाशी नसते. ते समयाप्रमाणे परिस्थिती-नुसार बदलू शकते, कमी वा संपूही शकते. ते कुणा व्यक्तीच्या संगामुळे असेल तर ती व्यक्ती संपर्कात असेल तोवरच टिकेल. संगाचा रंग हा इंद्रधनुष्याप्रमाणे असतो. इंद्रधनुष्य पावसाळ्यातच दिसते.

म्हणून प्रेमा तुझा रंग कसा हे सांगता येणार नाही, पण खऱ्या प्रेमात मात्र अंतरंग जरूर मिसळलेले असते, हे नक्की. खरे प्रेम आकाशाएवढे असते. खरं तर प्रेम वर्णन करायचं नसते, तर ते अनुभवायचे असते. आज सारेच दरवाजे बंद झाले आहेत, तशीच त्यात असलेल्यांची मनेही बंद आहेत. प्रेमानेच ही कवाडे उघडतील. प्रेम ही सर्वात मोठी परिवर्तन शक्ती आहे. एकत्र संगठनमध्ये काम करू लागलो की प्रेमही सहज जमू लागते. प्रेमाने विश्वास निर्माण झाला की आनंदाने जगणेही सहज जमून जाते. प्रभूप्रेमाचा, प्रभू मीलनाचा आनंद लुटता-लुटता मग मरजीवा होण्याचे सहज जमावे. एकाने प्रेमाची सुंदर व्याख्या केली आहे - *Love decides what is wrong instead of who is wrong.*

प्रेम हे चवीसारखे असते. जर पेढ्यातच चव आहे तर तो हातात असतानाच कळायला हवी आणि जर चव जीभेत आहे तर पेढा खायची गरज काय? वास्तविक चव जीभेतही नाही आणि पेढ्यातही नाही तर ती दोघांच्या मीलनात उत्पन्न होते. **त्याचप्रमाणे आत्मा आणि परमात्मा यांचे स्वतंत्र अस्तित्व असले तरी जीवनाची सार्थकता, संपन्नता त्यांच्या मीलनात आहे. हे उदात्त श्रेष्ठ, मंगल मीलन म्हणजे प्रेम. हे प्रेम हृदयातून पाझरते.** आपल्या हृदयातील खऱ्या प्रेमाचा, स्नेहाचा पाझर हा कधीच आटत नाही. कारण हे प्रेम - प्रभूप्रेम पवित्र आणि अविनाशी आहे. या प्रेम पाझराला दिशा देणे हीच आत्म्याची खरी साधना!

परमात्म स्नेह हा परिस आहे. आत्म्याला पूर्णत्व देण्याची ताकद या प्रेमातच आहे. आपल्या प्रेमाची ही शक्ती ओळखता आली पाहिजे. प्रेम ही हिऱ्यासारखी तेजस्वी, अमूल्य वस्तू आहे. हिऱ्याचे मूल्य त्याला पैलू पाडल्यानंतरच वाढते. दुसऱ्यांना प्रेम वाटणे हे त्याला पैलू पाडण्यासारखे आहे. हृदयापासून सर्व आत्म्यांना प्रेम वाटण्यानेच, देण्यानेच आपण साऱ्या जगाला स्नेही बनवतो. प्रेम वाटूनच वाढते. खरा भक्त जसा इष्ट देवतेच्या प्रेमात आकंठ बुडतो तेव्हाच त्याच्या भक्तीचा गंध वाढतो. प्रभूप्रेम हे निरपेक्ष निःस्वार्थ आहे, रुहानी-आत्मिक आहे. **या प्रभूप्रेमात रंगलेला ज्ञानी हा थोर विशाल अंतःकरणाचा असतो. त्याचं प्रेम जरी ईश्वरावर जडले असले तरी ते सर्वांसाठी असते. सारं विश्व त्याचे वाटेकरी असते. तो सर्वांना भरभरून प्रेम देत असतो. म्हणूनच ईश्वरीय प्रेम संगमयुगी ब्राह्मण जीवनाचा आधार आहे. ज्ञानी साऱ्या विश्वाच्या कल्याणासाठी चिंतित असतो.**

प्रेमाची प्रामाणिक भाषा फक्त ईश्वराला कळते. इतरांना ते प्रेम उमजण्यासाठी तेवढेच खरे, प्रामाणिक असावे लागते.

म्हणूनच निर्मळ, शुद्ध हृदयाचा ज्ञानी-योगीच प्रभूला आवडतो. त्याचे खरे आंतरिक प्रेमच त्याला भावते. त्याचे समर्पणच प्रभू स्वीकारतो. हे समर्पित प्रेमच आत्म्याचा हुंकार आहे. हा हुंकार परमात्म्यापर्यंत पोहोचण्यासाठीच प्रेमाच्या अंतःकरणात पवित्रतेचा ओलावा हवा.

**दिव्यत्वाचा स्पर्श हा फक्त खऱ्या प्रेमीलाच होऊ शकतो. त्यासाठी आपले प्रेम जीवंत, डोळस हवे, त्यात कुठलाही किंतु, परंतु वा विकल्प नको, त्यात शुद्ध तन्मयता, ओढ हवी तरच स्वतःचे अस्तित्व विसरूनच समर्पित होता येते. माझे मीपण विसरणे म्हणजेच प्रभू स्मृतीत दंगणे, लवलीन होणे, प्रभूसमान होणे**.

प्रेमी तर सर्वच आहेत पण एक प्रेम हृदयातून उत्पन्न होते, तर दुसरे मतलबी, स्वार्थवश होते, स्वार्थापोटी होते. तिसरे प्रेम हे नाईलाजाने, परिस्थितीजन्य असते. पहिल्या प्रेमात सर्व संबंध, सर्व प्राप्ती सहज अनुभवता येतात. एकही संबंध कमी नाही. जशी वेळ, समय तसे संबंध वा नात्यातील आपुलकीच्या छटा अनुभवाला येतात. वेळेवर, प्रत्यक्ष प्रमाण देणारे, परिस्थितीला अनुरूप असे ते प्रेम असेल. उदाहरणार्थ शिकताना शिक्षकाच्या रूपात तर कधी सखा वा दोस्त रूपात गप्पा-गोष्टीद्वारे सुसंवाद साधण्याचा निर्भेळ आनंदही घेता येईल; पण आपण जेव्हा विद्यार्थ्याच्या नात्याने संबंध जोडतो, तेव्हा मात्र सखा रूपात संवाद करणे योग्य नाही. ही आहे स्नेह वा प्रेम निभावण्याची रीत. त्या त्या संबंधाने वा नात्याने होणारी प्राप्तीही तेव्हाच यथार्थ म्हणता येईल.

समजा कधी मन भारी आहे, सचिंत आहे, तणावग्रस्त आहे. खरं तर असं होऊ नये पण त्या कलियुगात वेळ, परिस्थिती, समस्या प्रभावी ठरली की असे होते, त्यावेळी मग ज्या नात्याने, संबंधाने संपर्क करू इच्छितो ते नाते, तो संबंध निभावणे अवघड होईल. तेव्हा हे निभावणे युक्ती-युक्त व्हावे. वास्तविक तेव्हा आपल्या प्रेमाची, स्नेहाची जातकुळी जर अटल, अखंड, अचल असेल तर प्रेमाची एकरूपता, एकरसता आपली अनुभूती होईल. नाहीतर जशी वेळ, परिस्थिती वा मनःस्थिती (*mood*) बदलत राहील तशी ही प्रेमाची, स्नेहाची अवस्थाही बदलत राहील. ती अवस्था सदा एकरस, एकरूप राहाण्यासाठी हे प्रेम खरे अंतःकरणातून असावे. मग ते व्यक्ती, समय, वेळ, परिस्थिती यापैकी कशानेही प्रभावित होणार नाही. आपले प्रेम निःस्वार्थी, निरपेक्ष तर असावेच पण त्या प्रेमात हृदयाचा, आपुलकीचा, आत्मियतेचा ओलावाही असावा. आजच्या या कलियुगी दुनियेत खरे आत्मिक प्रेम कुठे शिल्लक आहे? असले तरी त्याला लोभ, मोह, स्वार्थाचा वास आहे.

एकदा एका राजाने एका अधिकाऱ्याला, एका सुभ्याची सुभेदारी दिली. तसे अधिकारपत्र देण्यापूर्वी राजाने त्याला काही आवश्यक सूचनाही दिल्या. तेवढ्यात एक बालक खेळत-खेळत राजाजवळ आले. राजाने मोठ्या प्रेमाने त्या मुलाला उचलून घेतले आणि विविध आवाज काढून त्याला खेळवू लागला. हे पाहून तो अधिकारी राजाला म्हणाला, महाराज, माझ्या घरी तर चार मुले आहेत परंतु त्यांना मी असे प्रेम कधीच दिले नाही. हे ऐकून राजा एकदम गंभीर झाला. त्याने त्या व्यक्तीला दिलेले अधिकार पत्र परत घेतले आणि त्याचे तुकडे-तुकडे केले. मग राजा म्हणाला, मला तुझ्या नेमणुकीचे वाईट वाटते. जर तू मुलांशी प्रेमाने वागू शकत नसशील तर तुझा व्यवहार प्रजेशी कसा असेल? तुझ्या हृदयातील प्रेमाची पवित्र धारा आटून गेली आहे, आता या पदासाठी तू योग्य नाहीस.

आम्हालाही प्रभूप्रेमास पात्र व्हावे लागेल. आज आत्मा विकारांनी, पतित बनला आहे. असा पतित, विकारी आत्मा परमात्म्याला कसा आवडेल, म्हणूनच ईश्वरी ज्ञानाच्या आधारे पावन होण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे. असा पवित्र, पात्र आत्माच ईश्वरी गुण, शक्ती प्राप्तीसाठी अधिकारी ठरेल. विकारी, पतित आत्मा मात्र अशा प्राप्तीं-पासून नेहमीच वंचित राहील. **परमात्म्याचे प्रेम हे पतित आत्म्याला पावन बनविणारे, त्याचे परिवर्तन करणारे चुंबक (*magnet*) आहे. ईश्वरी प्रेमाचा संबंध हृदयाशी आहे. हे प्रेम दोन हृदयांना जोडणारा दुवा आहे. या प्रेमानेच मने जोडली जातील**. आई-वडीलांचे, भावा-भावांचे, भाऊ-बहिणीचे, पति-पत्नीचे नाते निभावणारे लौकिक प्रेम आहे. ते कधी तुटूही शकते, त्याची खात्री नाही, कारण ते स्वार्थ,

अपेक्षांवर निर्भर असते. त्याची विभागणी व्हायला वेळ लागत नाही. परंतु परमपित्याचे प्रेम हे अभंग, अतूट असते. त्याच्या वाटा-वाटीने सारेच आपले सहयोगी बनतात.

परमात्मा शिव पिता चैतन्य बीजरूप आहे. बीजाला स्नेहाचे पाणी दिले की ते वृक्षाच्या प्रत्येक पानाला सहज मिळते. प्रत्येक पानाला वेगळे पाणी देण्याची गरज नसते. या पारलौकिक पित्याच्या प्रेमाने सर्वच आपले आपोआप स्नेही बनतात. आपल्या हृदयाची वाटणी होत नाही. प्रत्येक कर्म या प्रेमाने सहज सिद्ध होते, मेहनत घ्यावी लागत नाही. प्रेमामुळे याद-आठवण सहज होते. प्रेमीला सहज विसरता येत नाही. खऱ्या प्रेमामुळे सर्व संबंधांचा रस अनुभवता येतो. खरे प्रेम हे महापुरासारखे असते. तेथे स्वार्थाचे, अपेक्षांचे किनारे हरवतात. या प्रेमात फक्त देणे असते, फक्त देणे. पण या देण्यातून होणारी कमाई मात्र अनंत असते, अमाप असते.

**ज्ञानी बुद्धीने याद करतो. त्याची याद ज्ञानयुक्त असते. पण प्रभूप्रेमी अंतःकरणातून याद करतो. तेथे ज्ञानापेक्षा, विचारापेक्षा भावना वरचढ असते. जेथे विचार तेथे मेहनत असते, पण भावनेचा फुलोरा फुलला की प्रेमही मुक्तपणे सहज बहरते**. तात्पर्य ज्ञानी हा मेहनतीचे फळ खातो तर दिलवाला योगी हा उत्कट प्रेमाचे फळ चाखतो. केवढे अंतर आहे! प्रत्यक्षातही बुद्धीने केलेली सेवा थकवते तर अंतःकरणातून स्फुरलेल्या प्रेमाने अथक सेवा घडते.

ज्ञानीचे-बुद्धीवादीचे व्यर्थ संकल्प खूप चालतील कारण तो जेथे तेथे बुद्धी लढविल. का, कसे, केव्हा या प्रश्नांनी त्याची बुद्धी ठायी-ठायी कुंठीत होईल. त्यामुळे त्याला सदा युद्ध करावे लागते. पण जेथे प्रेम आहे, स्नेह आहे तेथे युद्ध नाही. स्नेही सदा स्मृतीत लवलीन राहील. त्याची याद आणि प्रेम एकरस राहील. असा प्रेमीच प्रभूला जास्त प्रिय असतो, असा प्रेमी नम्रही असतो.

पतंग (परवाना) प्रश्नांच्या कोळीष्टकात कधीच अडकत नाही. तो ज्योतीवर बेधडक स्वाहा होतो, समर्पित होतो. प्रभूपित्यावर हार्दिक, जिगरी प्रेम करणारे सहज बलिहार जातात. तेथे दुविधा नसते, असते फक्त समर्पण. प्रभूशी एकता, समानता आणि समरसता. प्रेमाचे प्रतीक आहे, हृदय-दिल. ब्राह्मणाकडे दिल आणि दिमाग (मन व बुद्धी) दोन्ही आहेत. तरीही त्याची याद निरंतर राहात नाही. तो वारंवार परमपित्याला विसरून जातो. कारण ईश्वरी ज्ञान त्याच्या बुद्धीपर्यंतच सीमित राहाते. मी आत्मा आहे, परमात्मा शिव माझा पिता आहे, तो भाग्यविधाता आहे. ही फक्त बौद्धिक समज राहाते. पण ही समज जेव्हा जाणीव-नेणीवेच्या पातळीवर हृदयापर्यंत खोलवर रुजते, भिडते, त्यात सामावते तेव्हाच ही याद, ही स्मृती स्थायी होते, टिकते. परमात्म प्रेमाने अनेक वरदानांनी आपली झोळी भरपूर होते. या संपन्नतेतून प्राप्त होणारी खुशी संतुष्टता अलौकिक आहे. ती इतर बाह्य गोष्टींनी कधीही प्रभावित होणार नाही.

म्हणून लौकिक व्यक्ती, वस्तु, वैभव, पदार्थाच्या प्रेमापोटी होणारा लगाव-झुकाव अर्थात आकर्षण, मोह हा फसवा, खोटा, भ्रामक, नुकसान करणारा आहे. आज आरामाची साधने खूप वाढली आहेत, **तेव्हा या आरामात राम (शिव) विसरला जाऊ नये. खरी सीता (पार्वती) होऊन राहण्यातच कल्याण आहे. सीता जोपर्यंत ईश्वरी मर्यादेची लक्ष्मणरेषा ओलांडत नाही तोपर्यंत ती सुरक्षित आहे, नाहीतर सुवर्ण-मृगाच्या मोहाने संकटात सापडू शकते, हे ओळखणे सुज्ञ-पणाचे होईल**. आपल्या गरजा जितक्या कमी असतील त्या प्रमाणात परमेश्वराचे सान्निध्य समीपता, समानता वाढत जाईल. परमपित्याने आपल्याला त्याच्या हृदयसिंहा-सनावर बसविले आहे. तसेच आपल्या हृदयात दिलाराम बापच आहे ही जाणीव सदा ठेवली तर त्याच्या स्नेह आणि शक्तीचे आपण अधिकारी होऊ.

स्नेह आणि शक्ती या दोघांच्या समानतेचे प्रतीक आहे, पिताश्री ब्रह्माबाबा. म्हणून ब्रह्माबाबांना पुरुषार्थात 'फॉलो फादर' केले पाहिजे. त्यांचा स्मृतीदिवस हा अशी समानता अनुभवण्याच्या वरदानाचा दिवस आहे. बापदादांच्या स्नेहा-मुळेच प्रत्येक आत्मा स्वतःला शक्तिशाली आणि भाग्यशाली अनुभव करतो. स्नेहाचे प्रत्यक्ष स्वरूप आहे समान होणे. हे आत्मिक प्रेम जितके घट्ट, खरे तितकेच मनात फॉलो फादर करण्याचा उत्साह दिसू लागेल. हे अलौकिक प्रेम

▶ पान क्र. २६ वर

ब्रह्मावत्सांकरिता...

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग - ५)

*ब्र.कु.रमेश शाह, मुंबई (गावदेवी).*

आपण सारे जाणतो की, हे विश्व-विद्यालय एक प्रशिक्षण केंद्र आहे, जेथे भविष्यातील विश्व-कार्यव्यवहारासाठी निमित्त बनणाऱ्या सौभाग्यशाली बंधु-भगिनींना परमात्माद्वारे शिक्षण मिळत आहे.

**या संदर्भात परमात्म्याने सांगितले आहे की, जे विश्व-सेवेसाठी निमित्त बनणारे आहेत त्यांना तीन प्रमाणपत्रे घेणे अगदी आवश्यक आहे - स्वयंपसंत, लोकपसंत आणि प्रभूपसंत! येथे लोक पसंत बनणे खूपच आवश्यक आहे कारण यावेळेस स्वतःमध्ये जे संस्कार भरले जातील त्या आधारावर भविष्यातील कारभार आपल्या हाती असेल.** याबाबत असे म्हटले जाईल की, तेथे जे विश्वमहाराजन बनतील ते इतके लोकप्रिय असतील की सारी प्रजा आपल्या राजाला आपल्या कुटुंबातील एक सदस्याच्या रूपामध्ये पाहतील आणि राजासुद्धा आपल्या प्रजेला आपला परिवार समजणारा असेल. तो प्रजेची खूप काळजी घेईल. जसे आपण येथे संगमयुगात म्हणतो की, 'मेरा बाबा, प्यारा बाबा, मीठा बाबा' त्याप्रमाणे सत्ययुगातही प्रजा आपल्या राजासाठी म्हणतील की 'माझा राजा, प्रिय राजा, मीठा राजा'. तेथे राजा आपल्या प्रजेच्या प्रत्येक कार्यात पूर्णरूपाने सहयोगी असेल. द्वापरयुगातही राजा विक्रमादित्याचे वर्णन 'परदुःखभंजन करणारा' असे होते तसेच तो प्रजेची सारी दुःखे दूर करण्यासाठी मदतगार होता. अशाप्रकारे अनेक राजे पूर्वी रात्री वेष पालटून आपल्या राज्यात फेरफटका मारून, आपल्या प्रजेच्या समस्यांची माहिती घेऊन, मग प्रजाहिताची कार्ये करीत असत. अशाप्रकारे प्रजाहिताचे संरक्षण करीत राहिल्याने प्रजा सुख-शांतीने आपले जीवन व्यतित करू शकत होती. यासाठी शास्त्रामध्ये गायन आहे की प्रजा आपल्या राजाला पितासमान मानून त्याचा सन्मान करीत असे.

महाकवी कालिदास यांनी रघुवंश मध्ये रघुवंशाच्या राजाची महिमा करताना म्हटले आहे की राजा आपल्या प्रजेकडून कोणत्याही प्रकारचा कर घेत नसे परंतु प्रजानन आपल्या बचतीतील धन स्वच्छेने राजकोषामध्ये जमा करीत असत व कृषी उत्पन्न राजभांडारामध्ये जमा करीत असत. अशाप्रकारे राजकोष भरभरून वाहत असे. तेव्हा रघुराजा दवंडी देत असे की ज्यांना जेवढे धन हवे तेवढे त्यांनी राजकोषातून घेऊन जावे. सत्ययुगी श्रेष्ठ दुनियेच्या राज्य-कारभाराबाबत असे गायन आहे की तेथील विश्व राज्य-अधिकारी श्रीलक्ष्मी-श्रीनारायण होते, ज्यांची पूजा आजही आपण मंदिरात करीत आहोत. आदर्श राज्यव्यवस्थेमध्ये राजा हा प्रजेमध्ये लोकप्रिय अर्थात लोकपसंत असणे अत्यंत जरूरीचे आहे.

आजच्या काळात दुनियामध्ये निवडणूका होत असतात आणि त्या काही ठिकाणी चार वर्षांनी तर काही ठिकाणी पाच वर्षांनी होत असतात. आज गादीवर कुणी एक असेल तर उद्या त्या जागी कुणी दुसरा असू शकेल आणि त्यामुळे राज्यकारभार नीट होत नाही. निवडणूकीच्या वेळी एका पार्टीचे लोक दुसऱ्या पार्टीच्या लोकांसाठी असभ्य व अशिष्ट शब्दांचा उपयोग करतात आणि कुप्रचार करतात. २५ ते ४० टक्के असे नेते असतात की ज्यांच्यावर कितीतरी कोर्ट केसेस चालू असतात. तेव्हा साधारण व्यक्ती विचारात पडतो की आपले नेते वा राज्यकारभारी असे कसे? जे असभ्य भाषा बोलतात आणि चुकीचे कार्य करतात त्या लोकांना आपण कसे आपले नेते बनविणार? याबाबत मी एक गोष्ट सांगतो. मुंबईत आमच्या सेवाकेंद्रावर एक पोलिस ऑफिसर येत असत. त्यांनी सांगितले की त्यांच्या जेलमध्ये एक नेताजी होते, ज्यांना कोर्टाच्या आदेशानुसार आत ठेवले होते. त्या नेताजीने जेलमधूनच निवडणूक लढवली आणि जिंकून विधायक बनले तेव्हा त्या पोलिस ऑफिसरची फार पंचाईत झाली. कालपर्यंत जो आमच्या जेलमध्ये राहून आम्हाला सलाम करीत होता, त्यांना आज आम्हाला सलाम करावा लागतो, ही वर्तमानकाळातील विडंबना आहे.

सत्ययुगी दुनियेतील कारभारात असा प्रकार होणार नाही, हे समजण्यासाठी आपल्याला परमात्म्याचा समाजवाद समजून घ्यावा लागेल. आजच्या दुनियेत वेळोवेळी निवडणूका होतात आणि ज्याला बहुमत प्राप्त होते तो राज्य करतो. परमात्म्याच्या निवडणूकीचा कारभार संगमयुगावर होतो. इथे परमात्मा सर्वांना एक समान ईश्वरी ज्ञान देतात, राजयोग शिकवितात आणि म्हणतात की तुम्ही तुमच्या पुरुषार्थाच्या आधारावर स्वतःच स्वतःचे भाग्य विधाता बना, मी नाही तुमचे भाग्य बनवित. तुमचे भाग्य ना कुणी बनवू शकतो अन् ना ही बिघडवू शकतो म्हणजेच शिवबाबा सर्वांना भविष्यातील श्रेष्ठ पदाच्या प्राप्तीची लॉटरी देतात. **संगमयुग एक असे निवडणूकीचे क्षेत्र आहे की, जेथे आपण आपल्या पुरुषार्थाच्या आधारावर भविष्य राज्य अधिकारी बनतो. म्हणून शिवबाबा म्हणतात की, 'जो करेगा, सो पायेगा।'** आम्हा सर्व ब्रह्मावत्सांना हे ज्ञान शिवबाबांनी दिले असतानाही आपण दैनंदिन जीवनातील समस्यांमध्ये इतके गढून जातो की भविष्यासाठी आपल्याला श्रेष्ठ भाग्य बनविणे शक्य होत नाही. एकदा साकार ब्रह्मा बाबांनी आपल्या सर्व मुलांना असा संदेश दिला की, 'मुलांनो जर तुमच्याकडे तुमच्या परिवाराचे पालनपोषण करण्याइतके पर्याप्त धन असेल तर अधिक धनप्राप्तीसाठी विशेष मेहनत न करता, ईश्वरी सेवेत लागून आपले भविष्य श्रेष्ठ भाग्य निर्माण करण्याची मेहनत करा.'

एकदा मी मधुबनमध्ये असताना ब्रह्माबाबा म्हणाले, 'मला जर कुणी विचारले की आज जर माझे शरीर सुटले तर मी काय पद प्राप्त करील तर ते मी सांगू शकेन.' यावर मी बाबांना म्हटले की बाबा, मग आज तर तुमच्याजवळ मोठी लाईन लागेल. तेव्हा बाबा म्हणाले, 'नाही बेटा, बाबाजवळ कुणीही येणार नाही कारण प्रत्येक जण आपला वर्तमान पुरुषार्थ आणि स्थितीअनुसार आपले काय पद असू शकेल ते जाणत असतो. प्रत्येक जण आपल्या स्वभाव-संस्काराच्या बंधनात किंवा अन्य दुसरे कोणते न कोणते असे काही बंधन असते की नाईलाजाने त्यासह चालत असल्याने इच्छा असूनही भविष्यातील श्रेष्ठ पद प्राप्त करू शकत नाही. अंतिम काळात प्रत्येकाला जाणीव होईल की, संगमयुगावर मला इतकी श्रेष्ठ संधी मिळाली होती परंतु पुरुषार्थ न केल्यामुळे श्रेष्ठ पदाची प्राप्ती होऊ शकली नाही आणि या कारणामुळेच सत्ययुगातील राजाच्या विषयी प्रजेच्या मनात ईर्ष्या वा द्वेषाची भावना नसेल उलट राजा आणि प्रजा यांच्यात आपसात सन्मानाची भावना असेल.

ही आपसातील सन्मानाची भावना आणि समानतेची भावना आपले प्रिय ब्रह्माबाबा, प्रिय मातेश्वरी आणि दादी प्रकाशमणीजी यांनी आम्हा सर्वांमध्ये निर्माण केली, ज्यामुळे या विश्व-विद्यालयाने आज सुमारे ७८ वर्षे पूर्ण केली. एकदा मी ज्ञानामृतामध्ये एक गंमतीने गोष्ट सांगितली होती की जर समजा आपल्या येथे निवडणूक झाली व त्यामध्ये एका बाजूला दादी प्रकाशमणीजी आणि दुसऱ्या बाजूने मी उभा राहिलो तर सर्वांची मते दादी प्रकाशमणीजींना जातील, अगदी माझेसुद्धा! आजच्या कम्युनिस्ट देशांमध्ये केवळ एकच प्रतिनिधी उभा राहतो आणि सर्व त्या एका प्रतिनिधीला आपले मत देतात व घोषित करतात की तो प्रतिनिधी बिनविरोध निवडून आला परंतु बाबाच्या यज्ञात असे होत नाही. दादी प्रकाशमणीजी जर शंभर टक्के मतांनी बिनविरोध निवडून आल्या तर त्याचा अर्थ असा आहे की लोकांनी दादीजींची लोकप्रियता आणि गुणांच्या आधारे स्वखुशीने त्यांना मत दिलेले आहे. **ही गोष्ट हे सिद्ध करते की आपले श्रेष्ठ भविष्य आजच्या वर्तमानावर आधारीत असते. तात्पर्य म्हणजे आपले बाबा, मम्मा आणि दादी इतके लोकपसंत आहेत की आपणच आपोआप त्यांच्या हाती आपल्या भविष्याचा राज्यकारभार सोपवून देऊ.**

अशाप्रकारे विश्वाच्या राज्यकारभारासाठी जे कुणी निमित्त बनतील त्यांच्यामध्ये एक वैशिष्ट्य असते, ज्याला मॅनेजमेंट गुरू लोक रचनात्मक असणे असे संबोधितात, म्हणजे ते आपल्या समवेत असलेल्यांना सतत काही ना काही रचनात्मक कार्यात मग्न ठेवतात. अशी माणसे सदैव आपल्या समवेत असलेल्या व्यक्तींच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील राहतात अन् कारभार पुढे चालवीत नेतात. फलस्वरूप त्यांचा कार्यव्यवहार इतक्या सुंदररितीने चालतो की त्यांचे सहकारीही कधीच आळस वा चालढकलपणा करीत नाहीत. दुःखाच्या काळातही त्यांचे वागणे असे असते की समोरच्या व्यक्तीच्या

मनात दुःखाची भावना येत नाही. मातेश्वरींनी ज्यावेळेस आपल्या शरीराचा त्याग केला होता तेव्हा आम्ही त्यांच्या पार्थिव शरीरावर अंतिम संस्कार करून परतल्यावर ब्रह्माबाबांना भेटलो. आमचे शोकमग्न चेहरे पाहून बाबांनी आम्हाला विचारले, 'मुलांनो, तुम्ही काय शोक व्यक्त करायला आला आहात की काय ? तुमची मम्मा तर श्रीलक्ष्मी बनण्याचा श्रेष्ठ पुरुषार्थ करून, श्रेष्ठ पदाची अधिकारी बनून गेली मग तुम्ही त्यांच्यासाठी का शोक करतां ?' नंतर बाबांनी हवाईमहल जेथे पाहुणे होते, तो खाली करून तेथे आलेल्या टीचर्स भगिनींसाठी त्रिदिवसीय राजयोग शिबीराचे आयोजन केले त्यामुळे त्यांचा शोक दूर झाला. अशाप्रकारे बाबांनी सेवेच्या नवनवीन पद्धतींद्वारे मुलांना विविध प्रकारच्या सेवेसाठी निमित्त बनविले. बाबा नेहमी मुलांना वेगवेगळ्या नवीन सेवांमध्ये व्यस्त ठेऊन त्यांच्यामध्ये उत्साह आणि उमंग भरीत असत.

नोव्हेंबर १९६८ मध्ये मधुबनमध्ये प्रिय ब्रह्माबाबांच्या मार्गदर्शनाखाली वर्ल्ड रिन्युअल स्पिरीच्युअल ट्रस्ट बनविण्याचे ठरले तेव्हा त्याचा समाचार मी भ्राता ब्र.कु. जगदीशजी यांना लिहित होतो. त्यावेळी तेथे बाबा पोहचले आणि त्यांनी मला विचारले, 'मुला काय करीत आहेस ?' मी म्हणालो, 'बाबा, वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट करण्याबाबतचा समाचार मी आदरणीय भ्राता जगदीशजी यांना लिहित आहे.' त्यावर बाबा म्हणाले, 'राहू दे मुला. बाबा स्वतःच त्यांना माहिती देतील. तुम्ही मुंबईला जाऊन ट्रस्टचे नोंदणीकरण करण्याचे कार्यव्यवहार करा.' बाबांच्या श्रीमतानुसार आदरणीय दादी प्रकाशमणीजी व मी मुंबईला गेलो. हा कार्यव्यवहार जेव्हा चालू होता तेव्हा बाबा रोज याबाबत आम्हाला मार्गदर्शन देत असत व आम्ही त्या अनुसारच ट्रस्टचे संचालन करीत राहिलो. याप्रकारे दिनांक १६ जानेवारी १९६९ ला वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट नोंदणीकृत झाला. नंतर बाबांनी मला अहमदाबादला पाठविले आणि म्हणाले, नखी लेकजवळ असलेल्या बुँदी कॉटेजची विक्री होत आहे, तर तुम्ही अहमदाबादला जाऊन त्याचा सौदा करा. अहमदाबादला जाऊन मी बाबांना माहिती दिली की या घराच्या कार्यव्यवहाराचे काम ९५% झाले आहे व फक्त आता अर्धा तासाचे काम राहिले आहे. परंतु घरमालक म्हणतो की घराची नोंदणी ७-८ दिवसानंतरच करू. त्यामुळे बाबांना विचारले की मी मधुबनला येऊ की बडोद्याला नवीन प्रदर्शनीचे कार्य चालले आहे तेथे जाऊ ? त्यावर बाबा म्हणाले की तुम्ही बडोद्याला जा. परंतु दादी प्रकाशमणीजीने मला माउंट आबूला येण्याचे निमंत्रण दिले. मी १९ जानेवारीला सकाळी १० वाजता मधुबनला पोहचलो. बाबा अव्यक्त झाल्यावर मधुबनमध्ये येणारा मी पहिला भाई होतो. मग बाबांच्या अंतिम संस्कारासाठी मी निमित्त बनलो.

अशाप्रकारे बाबा ईश्वरी सेवेत सदैव स्वतः तर तत्पर राहिलेच पण इतरांमध्येही उमंग-उत्साह भरत राहिले. सत्ययुगातील राजेसुद्धा आपल्या प्रजेला कोणत्या ना कोणत्या रचनात्मक कार्यात मग्न ठेऊन, अनेक प्रकारच्या प्रेरणा त्यांना देत राहतील. अशाप्रकारे प्रजा ही आपले जीवन आनंदाने व्यतित करीत राहिल. आपल्या प्रजेला रचनात्मक गोष्टींमध्ये व्यस्त ठेवण्याची जबाबदारी राजाची असेल आणि भविष्यासाठी हे संस्कार आपल्याला या संगमयुगीच धारण करायचे आहेत. आताच्या काळात नवीन-नवीन नियम बनविले जातात, पंचवार्षिक योजना बनविल्या जातात ज्या पूर्णपणे राबविल्या जात नाहीत. **सत्ययुगात नवीन नवीन कायदे तर नसतील पण नवनवीन कार्यक्रम मात्र बनत राहतील ज्यामुळे सर्वांचे जीवन उल्हसित राहील. अशाप्रकारे भविष्य राज्यकारभार करणारे लोकपसंत तर हवेतच पण रचनात्मक कार्य करणारे ही हवेत तसेच सर्वांच्या जीवनात उमंग-उत्साह आणणारे देखील हवेत.**

*(भावानुवाद : ब्र.कु. जयश्री, विक्रोळी-मुंबई)*

## शुभ भावनेचे बोल, हिरे-मोती समान

आपण महान आत्मे आहोत. त्यामुळे आपले बोल मधुर असले पाहिजेत. तसेच प्रत्येक आत्म्यासाठी शुभ-भावना संपन्न असले पाहिजेत. आपले बोल कधीही साधारण नसावेत. कोणीही अचानक जरी आला तरी त्याला असा अनुभव आला पाहिजे की हे बोल नसून मोती आहेत. शुभभावनेचे बोल सदैव हिरे-मोती समान असतात. अशाप्रकारचे आपले बोल आहेत का, हे चेक करा.

# त्वमेव माताच पिता त्वमेव

(भाग - १)

***ब्र.कु.हेमंतभाई, शांतिवन-आबू रोड.***

**संबंध हा सुखी जीवनाचा आधार आणि संपूर्ण व्यक्तिमत्वाचा सुरेख अलंकार आहे. खरोखरच संबंध म्हणजे भाव-भावनांच्या ओलाव्याने भिजलेलं, हृदयात प्रेमाने जपलेलं, स्नेहाच्या सोनेरी सौंदर्याने सजलेलं, मानव जीवनाचे लेणंच नाही का ? वास्तविक संबंधाशिवाय मानव जीवनाची कल्पना करणेच अशक्य आहे.** जसा मासा पाण्याविना जिवंत राहू शकत नाही तसे संबंधांशिवाय जीवनात जिवंतपणा नाही. मानव हा कुटुंबात राहणारा, परिवारात वाढणारा, समाजात वावरणारा सामाजिक प्राणी आहे. संबंधांच्या रेशमी धाग्यांनी भावनांची देवाण-घेवाण करण्याचा, नात्यांना जीवापाड जपण्याचा त्याचा स्वभाव आहे. जसे हृदयात रक्ताचे महत्व तसेच सुखी, समाधानी स्वस्थ जीवनात मधुर, मजबूत, घनिष्ठ संबंधांचे महत्व आहे. संबंध वा नाती, मग ती रक्ताची असोत वा जीवनयात्रेत बनवलेली (शिक्षक, गुरु, मित्र इ. संबंध) असोत; आपलेपणाचा स्वाद देणारे संबंध, स्वार्थरहित प्रेम लुटणारे संबंध, जीवनाला खरा अर्थ देतात. म्हणूनच तृप्तीचा आनंद देणारे, मनाला समाधान देणारे संबंध प्रत्येकाला हवे-हवेसे वाटतात. सुख-दुःखाच्या वेळी साथ देणारे दोन-चार जीवलग सोबत नसतील तर आयुष्य कंटाळवाणे वाटेल. पण प्रेमाची उधळण करणारे, वेळ प्रसंगाला धावून येणारे, जीवाभावाचे सगेसोयरे असले तर जीवनाचा प्रवास आनंदाने कधी संपतो, हे कळतही नाही.

जन्मदात्री आईच्या कुशीत आयुष्याची सुंदर पहाट होते. मातेच्या ममतामयी वात्सल्याचा स्पर्श, संगोपनासोबत अमृताची अवीट गोडी देतो. पित्याचे प्रेम छत्रछाया बनून रक्षण तर करतेच, त्यासोबत वारस हक्क देऊन पिता आपल्या बालकाला तन-मन-धनाने समर्थ बनवतो. शिक्षकाची शिकवण (शिक्षण) जीवनाच्या वेड्यावाकड्या वळणावर चालायला शिकवते व उच्च पदाच्या शिखरावर पोहचवते. आयुष्यात अचानक आपत्ती आली तर भाऊ मदतीला धाऊन येतो. जे आपण दुसऱ्यांना सांगू शकत नाही, असं मनातलं जिव्हाळ्याच्या मित्राला सांगतो. परिणामतः मनावर असलेलं ओझं हलक होतं. पति (किंवा पत्नी) जीवनाच्या गाडीचं चाक बनून, सुख-समृद्धीला गती देतो. पतिरूपाने सौभाग्याचा शृंगार प्राप्त होतो तर पत्नीच्या रूपात साथी, सांगाती मिळते. गुरु बुद्धीरूपी हातात ज्ञानाचा दीप देऊन, विवेकाच्या उजेडात, सत्कर्माच्या वाटेवर चालण्याचा मंत्र कानात फुंकतो. जेव्हा आयुष्याची सांज होते तेव्हा थकलेल्या तनाला व उदास मनाला पुत्र आधार देतो. शेवटी नानाविध नात्यांच्या गोड चवी चाखत, मानव जगाचा निरोप घेतो.

असे हे सर्व संबंधांचे सुख कोणी विरळाच प्राप्त करतो. तो खरोखरच भाग्यवान होय. प्रत्येक जण मातापित्याच्या पोटी जन्माला येतो. माता, पिता, बंधु, सखा, स्वामी, पुत्र, शिक्षक, गुरु या संबंधांद्वारे सुखाची कामना बाळगतो, त्या सुखासाठी झटतो. सुंदर अशी नात्यागोत्यांची गुंफण विणतो आणि अल्पकाळ सुख प्राप्त करण्यात सफल देखील होतो. **परंतु हे संबंधांचे सुख सध्याच्या या स्वार्थी जगात किती काळ टिकते, हे आपण जाणतोच. स्वार्थ संपला की आपलाही परका होतो. कामापुरता मामा आणि ताकापुरती आजी, ही आजच्या जगाची रीत आहे. चहुकडे देवाण-घेवाणीत स्वार्थ भरून उरलेला दिसतो.** जेथे नातेवाईकांच्या बुद्धीत संकीर्णता, भाव-भावनेत मलीनता, हृदयात उदारतेची कमतरता दिसते तेथे निःस्वार्थ, अमर्याद, संबंध-सुखाची अपेक्षा करणं कितपत योग्य आहे ?

ग्रीष्माचा कडक उन्हाळा सुरू झाला की नद्या-तलावांची पात्रं कोरडी पडतात. विहिरी आटू लागतात. तेव्हा माणूस असो वा पशू-पक्षी, सर्वच थेंबभर पाण्यासाठी व्याकुळ होऊन आकाशाकडे डोळे लावतात. जोपर्यंत वरुणराजा प्रसन्न होत नाही, धो-धो पाऊस पडत नाही, नद्या-नाल्यांना उधाण येत नाही, नद्या-विहिरी काठोकाठ भरत नाहीत तोपर्यंत शेतं हिरवी होऊन अन्नधान्य ही पिकत नाही. म्हणजे जोपर्यंत जल-जन्मदाता सागर, मेघरूपात पावसाच्या सरी बनून, दारी येत नाही तोपर्यंत अन्न-पाण्याच्या समस्येचे

कायमस्वरूपी समाधान होत नाही. तात्पर्य म्हणजे साऱ्या जगाच्या जलपूर्तीचे कार्य फक्त सागरच करू शकतो. त्याप्रमाणेच सांप्रत कलियुगाचा काळ हा ग्रीष्म ऋतुप्रमाणे आहे. येथे कोणीही व्यक्ती, दुसऱ्या व्यक्तीला सदा सर्व संबंधांचे सुख देऊ शकत नाही जेव्हा देहधाऱ्यांकडून संबंधांचे सुख मिळत नाही तेव्हा मानव मन ईश्वराकडेच धाव घेते.

**ईश्वर कधीही न सुकणारा, न आटणारा प्रेम व सुखाचा सागर आहे. त्याच्यापासून मिळणारे सुख कधी सरत नाही. तोच सर्व संबंधांचे सुख देणारा महासागर आहे.** त्याच्या तुलनेत देवात्मे, धर्मात्मे, महात्मे वा पुण्यात्मे म्हणजे प्रेमाच्या सरिता व सरोवर आहेत. त्यांचे प्रेम उन्हाळ्यात आटणाऱ्या विहिरी वा सुकणाऱ्या नद्यांप्रमाणे संपू शकते कारण हे सर्व देहधारी व्यक्तीच आहेत. परंतु परमात्मा शिव हा निराकार, विदेही व अशरीरी असल्याने, सागराप्रमाणे अमर्याद प्रेम लुटू शकतो. तोच जगाचा मालक तसेच पालक असून सर्व संबंध जोडण्यासाठी सर्वथा योग्य आहे. म्हणून गायन केले जाते -

**त्वमेव माताच पिता त्वमेव। त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव।।**

(भावार्थ : हे परमेश्वरा, तूच माझी आई, तूच माझा पिता, भाऊ आणि मित्र आहेस. तूच विद्या, धन आणि माझे सर्वस्व आहेस.)

परमात्मा म्हणजे साक्षात जीवनाच माधुर्य! परमात्मा म्हणजे अमृतस्वरूप जीवनरस! परमात्मा म्हणजे निर्मळ चैतन्य! हृदयमंदिर प्रकाशित करणारे देवाधिदेव! अतींद्रिय सुख देणारा कैवल्यधाम! म्हणूनच भक्तांनी प्रेमसागर प्रभूशी वेगवेगळे संबंध जोडले. रामकृष्ण परमहंसांनी परमेश्वराशी जगत्‌जननी मातेच्या रूपात मनाचं नातं जोडलं व भावमय भक्तिरसात तल्लीन होऊन आईच्या (महाकाली रूपात) उत्कट ममतामयी वात्सल्याची चव चाखली. संत जनाबाईने भगवंतास पितारूपात पाहिले व विठ्ठलाची लाडकी लेक बनून, पितृप्रेमाचा आनंद लुटला. सुदाम्याने सखा बनवून त्याच्याशी हृदयाचं रेशमी नातं गुंफलं. कर्माच्या गुह्यगतीचे ज्ञान देणाऱ्या ज्ञानेश्वरासाठी भगवंत परमशिक्षकच नव्हता का? अर्जुनासाठी युद्ध भूमीत ज्ञान देणारा सत्‌गुरु होता. संत शिरोमणी मीराबाईने श्रीकृष्णाला आपला प्रियतम बनवला. लाज लुटली जात असताना द्रौपदीने श्रीकृष्णाला बंधु रूपात पुकारले तेव्हा मदतीला धावत येऊन तिच्या शीलाची रक्षा केली. माता यशोदेने बाळकृष्णाला पुत्र रूपात प्राप्त करून पुत्रप्रेमाचा रस घेतला. संत-सज्जनांनी देवी-देवतांच्या साकार मूर्तीला ईश्वराचं रूप मानलं तरी त्यांनी मनात ईश्वर भक्तीचा भाव ठेवूनच देवी-देवतांशी नातं जोडलं. वास्तविक देवी-देवता हे देहधारीच होते पण भक्तांनी त्यांना ईश्वराच्या दृष्टीने पाहिले.

भक्तिमार्गात भावनेला प्राधान्य असते, 'जैसी रही भावना जाकी, प्रभू मूरत देखी उन जैसी' या म्हणीप्रमाणे ज्या रूपात ईश्वराला भेटायची इच्छा भक्तांनी बाळगली, त्या त्या संबंधाच्या रूपाने त्यांनी अनुभव केला. परमात्मा हा निराकार, अशरीरी, विदेही आहे. म्हणून भक्तांनी ईश्वरी रचना देवी-देवतांच्या (महाकाली, श्रीकृष्ण, विठ्ठल यांच्या) दैहिकरूपात ईश्वराचं अस्तित्व मानलं. परमात्म्याशी संबंध प्रस्थापित केला व समर्पण भावनेच्या जोरावर त्या संबंधाचे सुख लुटले. म्हणूनच देवाच्या दारी जाताना भक्तगण सर्व संबंधांचे परमात्म-स्वरूप ध्यानी मनी ठेवतात. ईश्वराचे त्या स्नेहरूपात स्मरण, वंदन, पूजन करतात. त्या संबंधाच्या सुखाने भावविभोर होतात. त्यांच्या **नवधा** भक्तीने प्रसन्न होऊन परमात्मा त्यांची मनोकामनाही पूर्ण करतो. अशा-प्रकारची भक्ती आपण मागील ६३ जन्मांपासून करीत आलो. त्या भक्तीचे फळ म्हणून सत्य ज्ञान देण्यासाठी, परमात्मा शिव पित्याचे दिव्य अवतरण आता झाले आहे. याचेच प्रतीक म्हणून भारतवासी शिवजयंती (महाशिवरात्री) मोठ्या उत्साहाने साजरी करतात. **या अनुषंगाने स्वयं शिव परमात्म्याने ब्रह्मामुखाद्वारे उच्चारण केलेली पुढील महा-वाक्ये बोधप्रद आहेत, 'मीठे बच्चे, उँच ते उँच तो है भगवान। शिवजयन्ति भी मनाते है। जो जरूर उसका अवतरण हुआ है। अवतरण एक बापका होता है और बाप का अवतरण होता भी भारत में है। परंतु भारतवासी भूल गये है। भक्त कहते भी है कि हम परमपिता परमात्मा की पूजा करते है परंतु वह कब आया, क्या किया? कुछ भी जानते नही।'**

▶ पान क्र. १४ वर

# अमृतवेला

*ब्र.कु.पद्मा, सायन - मुंबई.*

सहज पुरुषार्थ आणि सहज प्राप्तीसाठी सर्वात उत्तम वेळ अमृतवेला आहे. अमृतवेलेस आपल्या आत्म्याला अमृताने भरपूर केल्याने साऱ्या दिवसभर कर्मेही अशीच श्रेष्ठ होतील. वेला जशी श्रेष्ठ, अमृत श्रेष्ठ तसेच प्रत्येक कर्म आणि संकल्पसुद्धा सारा दिवस श्रेष्ठ होईल. जर ही श्रेष्ठ वेला साधारणरित्या घालवाल तर सारा दिवस संकल्प व कर्मेही साधारणच होत राहतील. तेव्हा असे समजावयास हवे की ही अमृतवेला साऱ्या दिवसाच्या समयाची आधार वेला आहे. जर आधार कमजोर वा साधारण बनवाल तर वरची रचनाही (बनावट) आपोआप अशीच होईल. त्यामुळे आधाराकडे जसे सदैव लक्ष दिले जाते तसेच दिवसाचा आधार काळ (फाउंडेशन टाइम) अमृतवेला आहे.

अमृतवेलेचे महत्व समजून वागाल तर कर्मेसुद्धा महान वा श्रेष्ठ होतील याला ब्रह्म-मुहूर्त ही म्हणतात. ब्रह्म-मुहूर्त आहे वा ब्रह्मा-मुहूर्त आहे? ब्रह्मा-मुहूर्तही बरोबर आहे कारण सर्वजण प्रजापिता ब्रह्मा यांच्या समान नव्या दिवसाचा आरंभ करीत असतात. तेसुद्धा बरोबरच आहे. पण ब्रह्म-मुहूर्ताचा अर्थ तरी काय आहे? त्यावेळेचे वातावरण असे असते की त्यामुळे आत्मा सहजच ब्रह्मनिवासी होण्याचा अनुभव करू शकतो. इतर वेळी आपण पुरुषार्थ करून आवाजापासून, वातावरणापासून स्वतःला अलग (डिटॅच) करतो, मेहनत करतो पण त्यावेळी या मेहनतीची आवश्यकता नसते. जसे ब्रह्म-घर हे शांतिधाम आहे, तसेच अमृतवेलेस-सुद्धा आपोआप शांती असते. शांतीमुळे शांत स्वरूपाची स्थिती (स्टेज) किंवा शांतिधाम निवासी होण्याची स्थिती सहजच धारण करू शकतो. तेव्हा जे श्रीमत मिळालेले आहे, ते ब्रह्म-मुहुर्ताच्या वेळी स्मृतीत आणाल तर ब्रह्म-मुहूर्त किंवा अमृतवेलेस श्रेष्ठ स्थिती सहज अनुभवाला येईल. पहा, विद्याभ्यास (पढाई) करणारेही अभ्यास लक्षात ठेवण्यासाठी याचवेळी अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात कारण याचवेळी सहज स्मृती राहते. तेव्हा आपली स्मृती सामर्थ्यशाली करावयाची असेल किंवा स्मृतीस्वरूप व्हावयाचे असेल तर अमृतवेलेच्या मदतीने सहजच स्मृती सामर्थ्यशाली करू शकता. अमृत वेळेच महत्व फार आहे, इतके महत्व तुम्ही या वेळेस देता किंवा कधी देता कधी देत नाहीत? वास्तविक अमृतवेळेला योगाभ्यास करणे ही पुरुषार्थाची फार सोपी युक्ती आहे. फक्त या युक्तीस इतके महत्व द्यावयास हवे. जसे श्रीमत आहे त्यानुसार वेळ ओळखून व समयानुसार कर्तव्य केले तर सर्व प्राप्ती करू शकाल. मग मेहनतीपासून मुक्त व्हाल. मुक्त होऊ इच्छित असाल तर त्यासाठी जे साधन आहे ते आत्मसात करा. तसेच रोज अमृतवेळेला एक स्वमान घ्या व दिवसभर त्या स्वमानाच्या नशेत राहा म्हणजे देह व देहाच्या दुनियेचा विसर पडेल. त्याचबरोबर अव्यक्त वतन आणि मूळ वतनमध्ये लवलीन रहाता येईल, अतींद्रिय सुख अनुभवाला येईल. उदाहरणार्थ, 'मी ब्राह्मण आत्मा रचयिता परमात्म्याची सर्वश्रेष्ठ रचना आहे.' अर्थात त्या रचनाकाराची मी सर्वश्रेष्ठ रचना आहे. माझ्यापेक्षा श्रेष्ठ रचना कुठलीच नाही म्हणजे मी किती श्रेष्ठ वा उच्च आहे. (विभिन्न स्वमानासाठी वाचकांनी 'वाह रे मैं ब्राह्मण आत्मा' हे पुस्तक अवश्य वाचावे.) दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अमृतवेळेचा योग चांगला होण्या-साठी, रात्री झोपण्यापूर्वी अर्धा तास शिवबाबांची आठवण अवश्य करा. स्वदर्शन चक्र फिरवा म्हणजे सकाळी उठल्यानंतर देखील तीच स्मृती राहिल. अमृतवेळेला विशेष बीजरूप स्थितीचा अभ्यास करा म्हणजे दिवसभर श्रेष्ठ स्थितीचा अनुभव येत राहिल. ❖❖❖

---

▶ पान क्र. १३ वरून

तात्पर्य म्हणजे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिव परमात्म्याचा सत्य परिचय प्राप्त करून घ्या. त्यासाठी ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या सेवाकेंद्राला अवश्य भेट द्या. तसेच एक शिव परमात्म्याशी सर्व संबंध जोडून, सर्व सुखाचा अनुभव करा. त्यासाठी देहसहित देहाच्या सर्व संबंधांना विसरून, स्वतःला आत्मा समजा व एक शिव परमात्म्याला (शिवबाबांना) आपला सर्व संबंधी बनवा म्हणजे आपले जीवन धन्य-धन्य होईल. ***(क्रमशः)***